ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# षोडश-निदान-संशोधन-मार्गदर्शन

*डॉ. शर्मिला वीरकर,

* तत्त्वज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ

**सारांश :**

*महाराष्ट्राच्या भारतातील भौगोलिक स्थानानुरूप महाराष्ट्रातील तत्त्वचिंतन सर्वसमावेशक व समन्वयक आहे. त्याचा वेध कालानुक्रमे घेता येतो नि तसेच तो व्यक्तिकेंद्री, ग्रंथकेंद्री, संकल्पनाकेंद्री, विषयकेंद्री, संस्थाकेंद्री असू शकतो. ह्या संदर्भात कोणत्या तऱ्हेचे संशोधन शक्य आहे, हे येथे स्पष्ट केले आहे.प्रादेशिक तत्त्वज्ञानाचा तौलनिक विचार करणे व अशा अभ्यासास चालना, गती देणे गरजेचे आहे.ह्या कार्यास गती देणे नव्या शैक्षणिक धोरणाशी सुसंगत आहे. नवीन शैक्षणिक धोरणात ज्या मूल्यांचे सूचन आहे, ती महाराष्ट्रातील व इतर प्रादेशिक तत्त्वज्ञानात अनुस्यूत आहेत व सुसंगत आहेत. म्हणून आपल्या दृष्टीने महाराष्ट्रातील तत्त्वचिंतन मोलाचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणातील वैश्विक दृष्टी राखणाऱ्या चिंतनाची परंपरा महाराष्ट्रास आहे नि त्या मूल्यांचा उद्घोषही येथील तत्त्वचिंतनात आहे. महाराष्ट्रातील तत्त्वचिंतनाची पुढील वाटचाल कशी असावी, ह्याचेही सूचन येथे आहे. एकंदरीत सोळा मुद्द्यांच्या आधारे संशोधनासंबंधीचे दिग्दर्शन येथे केले आहे.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्रातील तत्त्वचिंतनास निदान आठ शतकांची परंपरा आहे व गेल्या ७५ वर्षात नव्हे तर गेल्या दोन शतकांपासून त्यात आधुनिक प्रवाहही समाविष्ट झाले आहेत.म्हणून अभ्यासकांसाठी 'महाराष्ट्रातील तत्त्वचिंतन' हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे.त्याकडे आपले लक्ष वेधल्याबद्दल मी परिषदेची आभारी आहे. सोळा मुद्द्यांच्या आधारे महाराष्ट्रातील तत्त्वचिंतन भविष्यात कशा प्रकारे साकारता येईल, हे येथे प्रामुख्याने दाखविले आहे आणि त्याचा उद्देश नवीन शैक्षणिक धोरण कसे राबविता येईल, हे दर्शविण्याचा आहे. अर्थातच नवीन धोरणातील मूल्यांचा निर्देश करून विश्वात्मकतेच्या दिशेने मार्गक्रमण करण्याचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

परिषदेच्या माजी संमेलनाध्यक्ष डॉ. शुभदा जोशी यांनी संपादित केलेला "Perspectives on Maharashtra"- Cultural-Intellectual Contributions" हा देबीप्रसाद चटोपाध्याय यांच्या "History of Science, Philosophy and Culture in Indian Civilization"[1] ह्या बृहद् प्रकल्पांतर्गत प्रकाशित झालेला सहावा खंड आपल्या परिचयाचा आहे. त्यात महाराष्ट्रातील तत्त्वचिंतनाचा बहुआयामी वेध सविस्तर घेतला आहे. मात्र हे लेखन इंग्रजीत आहे. शिवाय एका दशकानंतर त्यात काही भर घालता येते का, हेही पाहणे आवश्यक असते. त्यातील प्रत्येक लेख संशोधकांस मार्गदर्शक ठरू शकेल असा आहे.

उदाहरणार्थ, डॉ. प्रतिभा कामतलिखित महाराष्ट्रातील मानववाद.

संपूर्ण महाराष्ट्राचा इतिहास,भूगोल,वस्त्रोद्योग,खाद्यसंस्कृती यांवर प्रस्तुत खंडात प्रकाशझोत टाकला आहे. तसेच नृत्य, संगीत, चित्रपट, नाट्य, शिल्प, दुर्ग, स्थापत्य, लोककला, आदी विविध क्षेत्रात स्वतंत्र ठसा उमटविणारी महाराष्ट्राची संस्कृती अधोरेखित केली आहे. प्रांतिक, वांशिक, धार्मिक रीतिरिवाज जपणारी, शिक्षणात अग्रेसर असणारी व विद्रोही चळवळींनाही दडपून न टाकणारी आपली संस्कृती लक्षात घेऊन करोनोत्तर झालेले बदल टिपणे आवश्यक आहे.समाजमाध्यमांची पकड, मोकळ्या संवादाचा अभाव, स्क्रीन-व्यसन यांसारख्या अनेक आव्हानांना सामोरे जात डिजिटल युगात वाचनसंस्कृतीत,अभ्यासरीतीत, संशोधनपद्धतीत झालेले लक्षणीय बदल तत्त्वचिंतकांसाठी दखलपात्र आहेत. (अर्थात आनंद ह्याचा आहे की महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेने हे लक्षात घेतले आणि अधिवेशनाची मध्यवर्ती संकल्पना असो की सूत्रे, स्पर्धेचे विषय असोत की परिसंवादाचे विषय असोत, सर्वत्र तशा सुस्पष्ट खुणा आहेत. त्याबद्दल संबंधितांचे कौतुक व अभिनंदन करावे तितके थोडे आहे. सोपी, चपखल, समर्पक, मार्मिक शब्दयोजना हे यशस्वितेचे गमक आहे आणि पत्रक वाचल्याक्षणी हे समाधान मिळते.) महाराष्ट्रातील तत्त्वचिंतनासंदर्भात सोळा मुद्दे मी येथे मांडणार आहे.

१. "महाराष्ट्रातील" म्हणजे केवळ मराठीतील नव्हे. प्रा. दान्द्रद, डॉ. जे. एन. चब, प्रा. के. जे. शहा, प्रा. मे. पुं. रेगे, प्रा. सुंदरराजन, डॉ. बारलिंगे, प्रा. एन. जी. कुळकर्णी, डॉ. एस. जी. मुद्गल, डॉ. सिनारी, प्रा. शानभाग, प्रा. दवे, … यांसारख्या अनेक महाराष्ट्रवासीयांनी आंग्लभाषेत किंवा इतर कोणत्याही भाषेत लिहिलेल्या तत्त्वचिंतनाचा समावेश महाराष्ट्रातील तत्त्वचिंतनात करावयास हवा.

२. प्रचंड आवाका असलेल्या ह्या विषयाची मांडणी अनेक प्रकारे करता येणे शक्य आहे.सगळ्यात सोपी पद्धत म्हणजे कालक्रमानुसार आढावा घेणे. महाराष्ट्रातील साहित्यातून तसेच संस्थांच्या, संघटनांच्या घटनेतून आणि मुख्य म्हणजे आचार-विचारातून प्रकट होणा-या तत्त्वचिंतनाचा कालानुसार वेध घेता येतो.

३. महाराष्ट्रातील तत्त्वचिंतनाचा कालानुक्रमे विचार न करता एकूण भूतकाळात कशा प्रकारे तत्त्वचिंतन साकारले, पद्धती नेमकी कशी होती, त्यामुळे काय साधले गेले, संतांच्या तत्त्वज्ञानाची सामाजिक फलश्रुती कोणती ह्याचा मागोवा घेणे व वर्तमानकाळात त्यात आशयाचे, पद्धतीचे व परिणामांचे झालेले बदल टिपणे तसेच भविष्यात कोणते बदल असतील व व्हावेत, ह्यासंबंधीचे अंदाज सप्रमाण वर्तविणारे संशोधनही शक्य आहे.

४. उपयोजित तत्त्वज्ञानातील नवनवी दालने दर्शविणारे माझे लेखन २०२० मध्ये ऑनलाईन व २०२२ मध्ये हार्डबाऊंड[2] स्वरूपात प्रसिद्ध झाले आहे. धर्माचे, विज्ञानाचे, साहित्याचे, गणिताचे, भाषेचे, इतिहासाचे, कलेचे, कायद्याचे, पर्यावरणाचे, राज्याचे, शिक्षणाचे, समाजाचे, स्त्रीतत्त्वाचे, मनाचे, जाणिवेचे, शांतीचे तत्त्वज्ञान विसाव्या शतकात विकसित झाले. भाषावार प्रांतरचनेनुसार, साहित्य संस्कृती मंडळे स्थापन झाली आणि हे ज्ञानभांडार स्वातंत्र्योत्तर काळात मराठी वाचकांसाठी उपलब्ध झाले.आता कालानुरूप भर घालून व्यापाराचे, कृत्रिमबुद्धिमत्तेचे, संगणकाचे, आंतरजालाचे, जागतिकीकरणाचे, खाजगीकरणाचे,

निर्मितिक्षमतेचे, जैवविदाशास्त्राचे, माहिती-तंत्रज्ञानाचे, जैवतंत्रज्ञानाचे, जैवविविधतेचे, जैव-रसायनशास्त्राचे, मानसशास्त्राचे, अतिमानसशास्त्राचे, पुरातत्त्वशास्त्राचे, शेतीचे, हवामानाचे, भूगोलाचे, भूगर्भराजकारणाचे, व्यवस्थापनाचे, आपद्कालीनव्यवस्थापनाचे, डिझाइनचे, पर्यटनाचे, स्वास्थ्याचे, वैद्यकीचे, निरामयतेचे, अन्नाचे, नातेसंबंधांचे, संस्कृतीचे, बँकिंगचे तत्त्वज्ञान, वित्तीय तत्त्वज्ञान व क्रीडातत्त्वज्ञान विकसित करून शिकविणे गरजेचे आहे.

५. महाराष्ट्रातील तत्त्वचिंतन कसे बहुआयामी आहे, सर्वसमावेशक आहे, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. परस्परविरोधी विचारप्रवाह पचवून कधी भेद मिटवून समन्वय साधत मिलाफाचे तर कधी वैशिष्ट्य राखत स्वतंत्रपणे महाराष्ट्रातील तत्त्वचिंतन साकारत जाते. गेल्या ७५ वर्षांचा विचार करता, विनोबांचे मिलाफाचे तर रॉयिस्ट स्वतंत्र वृत्तीचे निदर्शक आहे. दोहोंना सामावणाऱ्या महाराष्ट्रातील तत्त्वचिंतनाचा हा विशेष आहे. तो महाराष्ट्राच्या भारतातील भौगोलिक स्थानानुरूप आहे.महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणा-या विठ्ठलाला "महासमन्वय" मानले गेले.

गेल्या पंच्याहत्तरच नव्हे पण शतकाहून अधिक काळातील महाराष्ट्रातील तत्त्वचिंतन अज्ञेयवादी, ज्ञेयवादी, धार्मिक, निधर्मी, अनुभववादी, बुद्धिप्रामाण्यवादी, ईश्वरमय, निरीश्वरवादी, प्रवृत्ति-निवृत्तिपर, अध्यात्मनिष्ठ, पुरोगामी, ईश्वरमय, निरीश्वरवादी, अस्तित्ववादी, साफल्यवादी, विद्रोही, विश्लेषक, संश्लेषक, प्रांतिक, राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय, असे बहुपेडी आहे. विविध भूमिकांची मांडणी नि समन्वय नमूद करणे आवश्यक आहे.

६. महाराष्ट्रातील समग्र तत्त्वचिंतन हा विषय अतिव्याप्त आहे. तो व्यक्तिकेंद्री मानून एखाद्या किंवा निवडक तत्त्वचिंतकांचे जीवन, तत्त्वधारा नि कार्य मांडणे व त्याचा सांगोपांग विचार करणे शक्य आहे.

उदाहरणार्थ : आगरकर/ आगरकर व टिळक/ टिळक-सदाशिवशास्त्री भिडे, ज. स. करंदीकर, दादा धर्माधिकारी, सोनोपंत दांडेकर, आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, धर्मानंद कोसंबी, डॉ.बारलिंगे.

प्रस्तुत खंडात डॉ. मीनल कातरणीकर यांनी ह्या प्रकारे निवडक तत्त्वचिंतकांचे योगदान स्पष्ट केले आहे.

७. विषय व्यक्तिकेंद्री न राखता विशिष्ट क्षेत्र निवडून त्यात काळाच्या ओघात झालेले बदल टिपणेही महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ, "महाराष्ट्रातील धर्मचिन्तन" असा परीघ सीमित करून ज्ञानोबा ते ज्योतिबा-विनोबा, पंडिता रमाबाई, इरावती कर्वे, दि. के. बेडेकर, बाबासाहेब आंबेडकर, मे. पुं. रेगे, भा .ल. भोळे, रावसाहेब कसबे, ह्या विचारवंतांचे धर्माबाबतचे चिन्तन विचारात घ्यावे लागते. धर्माप्रमाणेच **शिक्षण, राजकारण, न्यायदानपद्धती, शेती, अध्यात्म** ह्या क्षेत्रांसंबंधी जे विचारमंथन झाले, तेही अभ्यासता येते

८. महाराष्ट्रातील तत्त्वचिंतन **ग्रंथनिष्ठही** असू शकते.ज्ञानेश्वरी, दासबोध आदी संतवचनांचे उगमस्थान महाराष्ट्र आहे. महाराष्ट्रातील सर्व प्रकारचे साहित्य-वैचारिक, काव्य, नाटक, कादंबरी, प्रवासवर्णन व कोष (दे. द. वाडेकर संपादित मराठी तत्त्वज्ञान महाकोश)

यातून व्यक्त होणारे तत्त्वचिंतन लक्षणीय आहे. वा. म. जोशी, के. वा. बेलसरे, ज. वा. जोशी, रवींद्र मनोहर ह्या प्राध्यापकांचा उल्लेख येथे करता येईल.

९. महाराष्ट्रातील तत्त्वचिंतनाचा मागोवा **संकल्पनाकेन्द्री**ही असू शकतो. उदा. निर्मीक, सद्धम्म, भुवनत्रय, महाराष्ट्र-धर्म, आनंदवनभुवन, संघशक्ती, अभंग, गाथा, आर्या आणि त्यांचे विविध अभ्यासकांनी लावलेले अन्वयार्थ, ग्रामगीता, जनताजनार्दन, लोकसंग्रह, कर्मयोग, स्वाध्यायपरिवार, विनोबांचा अपि/ "हि-सिद्धांत", क्रांतदर्शन, स्थितप्रज्ञदर्शन, कृषी-शेती, कांचनमुक्ती, दि. के. बेडेकरप्रणित"धर्मप्रायश्रद्धा", पु.य.देशपांडेप्रणित "खरापातंजलयोग", डॉ. ग. ना. जोशीप्रणित "भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास" यांसारख्या कळीच्या संकल्पना मध्यवर्ती मानून त्या अनुषंगाने तत्त्वचिंतनाचा धांडोळा घेता येतो, ही फक्त काही उदाहरणे आहेत.

१०. महाराष्ट्रातील अग्रगण्य **संस्था** निवडून तेथील संशोधनाचा आशय तसेच पद्धती लक्षात घेऊनही महाराष्ट्रातील तत्त्वचिंतनाचा अभ्यास करता येतो. स्वामीनारायण, इस्कॉनसारख्या संस्थांचे अकादमीय कार्यही लक्षात घेता येते.

विविध विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधनसंस्था, साहित्यपरिषदा, तत्त्वज्ञानपरिषदा, धार्मिक संस्था, राजकीय पक्ष, व्यासपीठे, वृत्तपत्रे तत्त्वचिंतन, विचारमंथन घडवून आणतात, चर्चासत्रे आयोजित करतात. संस्थानिहाय धांडोळा घेता येतो व कालानुक्रमे किंवा आशयसूत्रानुसार मांडता येतो. उदाहरणार्थ, NUPTA (Nagpur Philosophy Teachers Association), Poona Philosophical Union, BPS (Bombay Philosophical Society)

११. तत्त्वचिंतनाचा प्रचलित अर्थ अमान्य करत "तत्त्वचिंतन म्हणजे निव्वळ विश्लेषण" ही गेल्या शतकात पाश्चात्यांमध्ये रूढ झालेली तत्त्वज्ञानाची संकल्पना महाराष्ट्रातील विद्यापीठात जे तत्त्वज्ञान विभाग कार्यरत होते, तेथे शिरोधार्य मानली गेली. भाषेचे, भाषेतील संकल्पनांचे, चकव्यांचे विशदीकरण म्हणजेच तत्त्वज्ञान होय आणि ह्या प्रकारच्या तत्त्वज्ञानाने अखेर हाती काहीच लागत नाही, मात्र पण तो "इम्पॉर्टन्ट नॉन-सेन्स असतो" हे लक्षात येणे,ह्याचे भान होणे म्हणजेच तत्त्वज्ञान, ही जाणीव आधिक्याने रुजली.

अस्तित्ववाद,फलप्रामाण्यवाद,विरचनावाद,पर्यावरणवाद,स्त्रीवाद, हे संलग्न विचारप्रवाह. जगभरच्या ह्या प्रवाहांचे प्रतिबिंब महाराष्ट्रातही गेल्या ७५ वर्षांत उमटले आणि महाराष्ट्रातील तत्त्वचिंतन आधुनिक साज ल्याले.

मार्क्सवाद, गांधीवाद, समाजवाद आणि पोथीवाद होतेच परंतु तत्त्वज्ञान परिषदेचे अध्यक्ष दि. य. देशपांडे, मे. पुं. रेगे, यांसारख्या नामवंतांनी तत्त्वज्ञानाच्या अध्यात्माधिष्ठित संकल्पनेला छेद देणारी व तार्किक विश्लेषणाला महत्त्व देणारी संकल्पना नेटाने मराठीत आणली, रुजविली. त्या अनुषंगाने संस्कृत पंडितांना रसेलसारखा तत्त्वचिंतक समजावणे आणि पंडितांकडून नव्यन्याय शिकणे हे उद्दिष्ट बाळगून "पंडित-फिलॉसॉफर प्रोजेक्ट" (PPP)महाराष्ट्रात ठिकठिकाणी (वाई, नागपूर, पुणे, मुंबई) राबविला.

12. महाराष्ट्रातील तत्त्वचिंतनाचा आढावा घेताना काही लेख/ निबंध यांचा उल्लेख करावा लागेल आणि अशा निवडक लेखांस महाराष्ट्रातील बहुआयामी तत्त्वचिंतनाचे निदर्शक मानता येईल. उदा.एकोणिसाव्या शतकातील विष्णुबुवा ब्रह्मचारी

यांचे"सुखदायक राज्यप्रकरणी निबंध" किंवा आगरकरांचे “महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र” किंवा विनोबांचे “महाराष्ट्रीयांशीं हितगुज”.

13. विनोबा सुरुवातीलाच म्हणतात, महाराष्ट्रात एकनाथांनी भगवंतासाठी एकादश स्कंध निवडला. त्यात व्यक्ती म्हणून कृष्णहेत पण बोधरूपात प्रामुख्याने आहेत.
14. ज्ञानेश्वरी "देशीकराचे लेणे" लेणे एकसंध, एकांशी असते. घटकपदार्थ एक आणि एकच असतो. “चक्रधर, मुकुंदराय, ज्ञानदेव यांपासून अखंड संतपरंपरेच्या ओघांत दिसून येते ती महाराष्ट्राची संस्कृती”[4] असा निर्वाळा त्यांनी महाराष्ट्रीयांशी हितगुज करताना दिला आहे.
15. अशी संतपरंपरा फक्त महाराष्ट्रातच होती, असे म्हणणे अपुरे होय. बंगाल, गुजरात, कर्नाटक, पंजाब, तामिळनाडू, .... अशा सर्व राज्यांना तत्त्वचिंतनाची मोठी परंपरा आहे. सर्व प्रादेशिक भाषांमधील तत्त्वज्ञानाची मुद्देसूद मांडणी मराठी तत्त्वज्ञान महाकोशात आढळते. प्रादेशिक तत्त्वज्ञानाचा तौलनिक विचार करणे व अशा अभ्यासास चालना, गती देणे गरजेचे आहे.
16. ह्या कार्यास गती देणे नव्या शैक्षणिक धोरणाशी सुसंगत आहे. नवीन शैक्षणिक धोरणात ज्या मूल्यांचे सूचन आहे, ती महाराष्ट्रातील व इतर प्रादेशिक तत्त्वज्ञानात अनुस्यूत आहेत व सुसंगत आहेत. म्हणून आपल्या दृष्टीने महाराष्ट्रातील तत्त्वचिंतन मोलाचे आहे.
17. नवीन शैक्षणिक धोरणाचा नव्या संदर्भात उद्घोष करताना महाराष्ट्रातील तत्त्वज्ञानाची दिलेली जोड लक्षणीय ठरते. प्रत्येकातील जिज्ञासा तसेच सृजनशीलता जोपासणे, विरोधीमतसहिष्णुता, परस्परसंवेदनशीलता ही मूल्ये राखत पुढील वाटचाल करावयाची आहे. एकात्म दृष्टी विकसित करण्यासाठी प्रयत्नशील राहून दार्शनिकानी सुचविलेली उत्तरे वर्तमानकालीन समस्या सोडविताना कशी मार्गदर्शक ठरतात, ह्याचा विचार महाराष्ट्रात सातत्याने होत राहिला.चार्वाकदर्शनही निषिद्ध न मानता प्रा. सदाशिव आठवले, थोर विचारवंत आ. ह. साळुंखे, डॉ. प्रदीप गोखले, डॉ. उदय कुमठेकर, डॉ. शुभदा जोशी आणि लोकमान्य टिळकांसारख्या अनेक मान्यवरांनी लोकायतमत विचारात घेतले नि काहींनी सुशिक्षिततम म्हणता येईल, अशी सयुक्तिक मांडणी केली. अद्वैतदर्शनाची प्रा. श्री. ह. दीक्षित यांनी केलेली मांडणी व त्यांचा "Yes, हा लेख प्रसिद्ध आहे. डॉ. एस. जी. मुद्गल ह्यांनी अद्वैत वेदांताचा पुनर्विचार केला तर डॉ. बळीराम शुक्ल ह्यांनी न्यायदर्शनासंदर्भात, डॉ. शि. स. अंतरकर ह्यांनी जैनदर्शनासंदर्भात, डॉ. प्रदीप गोखले ह्यांनी पातंजलयोगासंदर्भात दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. डॉ.बारलिंगे ह्यांनी एकूण तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, सौंदर्यशास्त्र आदी शाखांचा नव्याने नव्या संदर्भात विचार करण्याची दृष्टी दिली.
18. नवीन शैक्षणिक धोरणात भाषाकौशल्यविकासावर भर देण्यात आला आहे. विश्लेषक तत्त्वज्ञानामुळे केवळ भाषिकच नव्हे तर विश्लेषणात्मक कौशल्ये सहज विकसित होतात. उदाहरणार्थ, युक्तिवादात्मक तत्त्वचिंतनामुळे बौद्धिक क्षमता वाढीस लागतात. अनुसंधानात्मक तत्त्वचिंतनामुळे परंपरेचा मागोवा स्वतंत्रपणे घेता येतो. कोणत्याही विचारधारेचा निःपक्षपाती भूमिकेतून विचार

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

करता येतो. ग्रंथांचा अन्वयार्थ अनाग्रही वृत्तीने लावता येतो. बहुसांस्कृतिक, बहुभाषिक, बहुप्रांतिक, बहुराष्ट्रीय मानवी जीवनात ह्या क्षमता विकसित होण्याची नितांत गरज आहे आणि ती तत्त्वचिंतनाने भरून निघते. ५+३+३+४ हा पर्याय रूढ करताना तत्त्वज्ञान हा विषय कोणत्या टप्प्यावर व कसा शिकवावा, हा आज कळीचा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील तत्त्वचिंतनाचा विचार करताना ह्या प्रश्नावर चर्चा व्हावी, असे वाटते. शेवटची चार वर्षे तत्त्वज्ञान शिकवताना खालीलपैकी जो अभ्यासक्रम शिकविणे विद्यार्थ्यांच्या हिताचे असेल व व्यावहारिक दृष्ट्या संस्थेस सोयीचे असेल, तो स्वायत्त महाविद्यालयांस विविध संस्थांच्या सहकार्याने/ संयुक्त विद्यमाने राबवता येईल. उदाहरणार्थ,

- भक्तीचे तत्त्वज्ञान
- नाट्य तत्त्वज्ञान
- पर्यटनाचे तत्त्वज्ञान
- माध्यमांचे तत्त्वज्ञान
- छायाचित्रणाचे तत्त्वज्ञान
- कृत्रिमबुद्धिमत्तेचे
- आंतरजालाचे, माहिती-तंत्रज्ञानाचे, जैवतंत्रज्ञानाचे, जैव-विदाशास्त्राचे, जैव-विविधतेचे, जैव-रसायनशास्त्राचे तत्त्वज्ञान

तत्त्वज्ञान विभागातच नव्हे तर पर्यटनक्षेत्रात, छायाचित्रणक्षेत्रात, माध्यमात, विदाशास्त्रात,जैव-रसायनशास्त्रात मुळापर्यंत जाऊन मूलगामी विचार करू शकण्याची क्षमता विकसित करावयाची असेल, तर तत्त्वज्ञानास पर्याय नाही. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना कधीही बाहेर पडता येते. म्हणून असे व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम असतील तर उपजीविकेचे साधन सहज मिळू शकते  व ते कौशल्यपूर्वक राखता येते.

मात्र तत्त्वज्ञानाच्या ज्या मूळ शाखा आहेत, त्यास हे व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम पूरक असावेत-मारक नसावेत. राज्यमीमांसा, समाजमीमांसा, नीतिमीमांसा, धर्ममीमांसा, ज्ञानमीमांसा, वस्तुमीमांसा यांच्या जोडीने वरील अभ्यासक्रम शिकवले तर स्वार्थ, परार्थ व परमार्थ सर्वांस साधता येईल, हे म्हणणे म्हणजे अतिशयोक्ती नव्हे. पदव्युत्तर स्तरावर तौलनिक विचार प्राधान्याने केला जाईल. ऑनलाईन शिक्षणामुळे ते सहज शक्य झाले आहे. परंपरा व नावीन्य ह्यांचा अपूर्व संगम नवीन शैक्षणिक धोरणात अभिप्रेत आहे आणि तत्त्वज्ञानास त्यामुळे अधिक वाव मिळेल, ह्याची खात्री आहे.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार, Conceptual understanding, Critical thinking, Ethics, Constitutional Values अपेक्षित असल्यास अनुक्रमे विश्लेषणात्मक तत्त्वज्ञान, हेत्वाभास स्पष्ट करणारे तर्कशास्त्र, यम-नियम आखून देणारे योगशास्त्र,

व्रते-सद्धम्म शिकविणारी जैन-बौद्ध दर्शने विसाव्या शतकात महाराष्ट्रात नव्याने शिकवली गेली. हे संचित पुढील पिढयांस सद्यस्थिती लक्षात घेऊन समजावयाचे आव्हान आपल्यापुढे आहे. कला ("Art-integration") व क्रीडा ("Sports-integration") यांचे मानवी जीवनातील स्थान त्यांस अनुभवाअंती समजावे, ह्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचा निर्देश नव्या शैक्षणिक धोरणात आहे. म्हणूनच सैद्धांतिक पातळीवर कला व क्रीडा शिकविण्याचे आव्हान आपल्यापुढे प्रामुख्याने आहे. कलेचे तत्त्वज्ञान विकसित आहे परंतु क्रीडा तत्त्वज्ञान/स्पोर्ट्स फिलॉसफी साकारण्याची गरज आहे.

कला व क्रीडा अभ्रासक्रमात समाविष्ट करताना कला-भान, क्रीडा-भान रुजविण्याबरोबर कलेची, क्रीडेची मीमांसाही संवर्धनासाठी पोषक आहे, आवश्यक आहे. नवीन शैक्षणिक धोरणात आंतरशाखीय अभ्यास अभिप्रेत आहे. त्यामुळे निखळ तत्त्वचिंतनाच्या जोडीला असे अभ्यासक्रम राबविणे ही काळाची गरज आहे.

19. आपल्याला जो समाज भविष्यात अपेक्षित आहे तो दार्शनिक परंपरेला, धर्मग्रंथांना अभिप्रेत असणा-या आदर्श पुरुषासारखा आहे ना, हेही तपासून पाहायला हवे. सेवातत्पर व स्थितप्रज्ञ ह्यात विरोध नाही ना, कर्मी व ज्ञानी हे दोन वेगळे वर्ग नाहीत ना, कर्तव्यपरायण ज्ञानी अपेक्षित आहेत ना, हे स्पष्ट करायला हवे. आंतरराष्ट्रीय शिक्षणाचा अर्थ केवळ भारतीय विद्यार्थी परदेशी जाणे व परदेशी विद्यार्थी भारतात येणे असा नसून वास्तविक इंटरनॅशनल माईंडेडनेस म्हणजे वैश्विक दृष्टी असा होय. तो अधोरेखित करावयाचा असल्यास अद्वैती तत्त्वज्ञानास पर्याय नाही, असे म्हणून तूर्त येथे सोळा मुद्द्यांचे विवेचन करून थांबते.

**संदर्भसूची:**

- २०१३ मध्ये Centre for studies in civilizations, नवी दिल्ली येथून प्रकाशित केलेला ग्रंथ
- www,sharmilavirkar@medium.com
- "Philosophising, Philosophers, Philosophy and New Vistas in Applied Philosophy"- Himalaya Publishing House
- रा. चिं. ढेरे- श्रीविठ्ठल": एक महासमन्वय- पद्मगंधा प्रकाशन, पुणे १९८४
- https://docs.google.com/file/d/0B-ZWGF0lkaCBNDRnMjZCV1h3WjQ/edit?resourcekey=0-eGsF1NHFxj4-XeNF1_9rjg.पृ.६
- तत्रैव, पृ.७

**Cite This Article:**

*डॉ. शर्मिला वीरकर, (2022)* **षोडश-निदान-संशोधन-मार्गदर्शन**, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume no XI (Special Issue-I), 8-14.*